**“छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना २०१७” या योजनेच्या अंमलबजावणीसाठी मंत्रीमंडळ उपसमिती गठीत करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग**
**शासन निर्णय क्रमांक: कृकमा ०७१७/प्र.क्र.१२७/२-स,**
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : २ ऑगस्ट, २०१७.

**वाचा :-** १) शासन निर्णय, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग क्र. कृकमा ०६१७/प्र.क्र.१२७ /२-स, दि.२८ जून २०१७

**प्रस्तावना : -**

“वाचा” येथील शासन निर्णयान्वये "छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना-२०१७" जाहीर करण्यात आली आहे. सदर शासन निर्णयामध्ये नमूद केल्यानुसार योजनेच्या अंमलबजावणीसाठी काही अडचणी उद्भवल्यास अथवा त्यामध्ये काही प्रासंगिक आवश्यक बदल करावयाचे असल्यास त्यासाठी मंत्रीमंडळ उपसमिती गठीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय : -**

उपरोक्त पार्श्वभूमीवर "छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना-२०१७" या योजनेच्या अंमलबजावणीसाठी खालीलप्रमाणे मंत्रीमंडळ उपसमिती गठीत करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.

| | | |
|---|---|---|
| १ | मा. श्री. सुभाष देशमुख, मंत्री (सहकार) | अध्यक्ष |
| २ | मा. श्री चंद्रकांत पाटील, मंत्री (महसूल) | सदस्य |
| ३ | मा. श्री. सुधीर मुनगंटीवार, मंत्री (वित्त) | सदस्य |
| ४ | मा. श्री. गिरीष महाजन, मंत्री (जलसंपदा) | सदस्य |
| ५ | मा. श्री दिवाकर रावते, मंत्री (परिवहन) | सदस्य |
| ६ | मा. श्री. पांडुरंग फुंडकर, मंत्री (कृषि) | सदस्य |
| ७ | अपर मुख्य सचिव (वित्त) | सदस्य |
| ८ | अपर मुख्य सचिव (सहकार) | सदस्य |
| ९ | प्रधान सचिव (कृषि) | सदस्य |
| १० | प्रधान सचिव (माहिती व तंत्रज्ञान) | सदस्य |

सदर उपसमितीची कार्यकक्षा खालीलप्रमाणे राहील :-

१) योजनेच्या अंमलबजावणीसाठी काही अडचणी उद्भवल्यास त्यासंदर्भात पुढील निर्णय घेणे

२) योजनेमध्ये काही प्रासंगिक आवश्यक बदल करावयाचे असल्यास त्यासंदर्भात पुढील निर्णय घेणे

३) योजनेच्या अंमलबजावणीचे संनियंत्रण करणे

४) योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीच्या दृष्टीने या क्षेत्रातील तज्ञांशी सल्लामसलत करुन निर्णय घेणे

५) या योजनेबाबत उपसमितीने घेतलेले निर्णय अंतिम राहतील.

ही उपसमिती पुढील आदेशापर्यंत कार्यरत राहील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेतांक २०१७०८०२१४४५३५७७०२ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Ramesh Shankarrao Shingte

Digitally signed by Ramesh Shankarrao Shingte
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Co-Operation, Marketing And Textile Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=fed1b2ed6e1e4aca719170d9eae8aa251ee28dc56c75d8a65acb34103d45bd48, cn=Ramesh Shankarrao Shingte
Date: 2017.08.02 14:47:05 +05'30'

(रमेश शिंगटे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रति,**

१) मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
२) मा. मंत्री ( महसूल ) यांचे खाजगी सचिव
३) मा. मंत्री ( वित्त ) यांचे खाजगी सचिव
४) मा. मंत्री ( जलसंपदा ) यांचे खाजगी सचिव
५) मा. मंत्री ( परिवहन ) यांचे खाजगी सचिव
६) मा. मंत्री ( कृषि ) यांचे खाजगी सचिव
७) मा. मंत्री ( सहकार ) यांचे खाजगी सचिव
८) मा. अप्पर मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
९) सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे
१०) निवड नस्ती.